मंगळवार दि.१७ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : १६
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक बीड लोकनेता
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# शरद पवारांमुळे महाराष्ट्राला जातीयवादाचा कॅन्सर त्यांच्यामुळेच राज्याची झळाळी हरवली-पडळकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राला जातीयवादाच्या कॅन्सरची लागण झाल्याची विखारी टीका भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी सोमवारी केली. शरद पवारांनी ५० - ६० वर्षांत महाराष्ट्राला लुटण्याचे काम केले. त्यांच्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला दिलेली तेजाची झळाळी हरवली, असे ते म्हणालेत. गोपीचंद पडळकर सोमवारी म्हणाले की, शरद पवार म्हणतात सत्ता हातात द्या महाराष्ट्राचा चेहरा बदलून दाखवू. मी त्यांच्या अर्ध्या वक्तव्याशी सहमत आहे. कारण महाराष्ट्राचा चेहरा बदलण्याची असलेली गरज देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण केली. याऊलट शरद पवारांमुळे महाराष्ट्राच्या पुरोगामी चेहऱ्याला केवळ जातीयवादाचा कॅन्सर झाला. छत्रपती शिवाजी महाराजांना अपेक्षित असणारा महाराष्ट्र पवारांनी स्वतःची खासगी कंपनी म्हणून वापरला. आदी ही कंपनी पवार प्रायव्हेट कंपनी होती. आता ती सुळे प्रायव्हेट कंपनी झाली आहे.

गोपीचंद पडळकर म्हणाले, शरद पवारांमुळे राज्याच्या पुरोगामी चेहऱ्याला जातीयवादाच्या कॅन्सरची लागण झाली. त्यांच्यामुळेच छत्रपती शिवाजी हमाराजांमनी दिलेली तेजाची झळाळी हरवली. शरद पवारांची कारकिर्द ही महाराष्ट्राच्या इतिहासातील काळी पाने आहेत. आता महाराष्ट्राला विकासाचा सर्वसमावेशक चेहरा मिळाला आहे. हा चेहरा बदलून त्यांना पुन्हा महाराष्ट्रावर सरंजामी लादायची आहे का? दलित ओबीसी अत्याचाराचे नवे अध्याय लिहायचे आहेत का? गोपीचंद पडळकर यांनी यावेळी शरद पवारांना निवांत राहून हरीनामाचा जप करण्याचाही सल्ला दिला. ते म्हणाले, शरद पवारांनी जाती-जातीत वाद लावून महाराष्ट्र अशांत ठेवण्याचे व प्रस्थापितांची घरे भरण्याचे काम केले. त्यांनी भ्रष्टाचार, जातीवाद केला. लोकांमध्ये भांडणे लावली. याला कंटाळून महाराष्ट्राच्या जनतेने २०१४ साली परिवर्तन केले. आता पवारांनी निवांत राहून हरीनामाचा जप करावा. त्यातून त्यांच्या डोक्यात चांगले काम करण्याची इच्छा जागृत होईल.





# डॉ.महेश थोरवे यांचा आष्टी मतदारसंघात ठिक ठिकाणी गाठीभेटी,नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**आष्टी । राजू म्हस्के**



जवळपास चार दशकापासून पासून आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघ हा आजी माजी लोकप्रतिनिधीनी आलटून पालटून या मतदारसंघाचे नेतृत्व केलं असून गेल्या ४५ वर्षां पासून आजतागायत ग्रामीण भागातील रस्त्याची पार वाट लागली असून दळणवळणाची साधने नसल्याचे उद्योग व्यवसायात वाढ होत नाही त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे,ज्या ग्रामीण भागात रस्ते,वीज,पाणी अश्या मूलभूत सुविधा उपलब्ध व्हायला पाहिजे होत्या अजून पर्यंत झाल्या नसल्याने फक्त निवडणूक आली की,नवनवीन आश्वासन दिले जाते अन सत्तास्थाने काबीज केले की सोयीस्करपणे दिलेले आश्वासनाकडे दुर्लक्ष केले जाते.त्यामुळे आपल्या गावाबरोबर संपूर्ण मतदारसंघात विकास करावयाचा असेल तर परिवर्तन घडवून आणण्यासाठी नवा कोरा चेहरा दिला तर नक्कीच विकास झाल्याशिवाय राहणार नाही अशी चर्चा सर्वसामान्य नागरिकांमध्ये होतांना दिसत आहे, अशाच एका शेतकऱ्यांच्या कुटुंबातुन उदयास आलेले उच्च विद्याविभूषित असलेले शैक्षणिक,सामाजिक, प्रशासकीय जाण असलेले डॉ.महेश थोरवे हे पुरोगामी विचारांचा वसा अन वारसा जपत असून शरदचंद्र पवार साहेबांनी संधी दिल्यास नक्कीच आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे नव्या चेहरा म्हणून या मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी द्यावी अशी विनंती गावागावात भेटीगाठी घेऊन डॉ थोरवे करतांना दिसत असून त्यांना प्रत्येक ठिकाणी मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते नुकतेच त्यांनी आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील अनेक गावात मोर्चेबांधणी केली आहे शरदचंद्र पवार यांच्याकडे आपण पक्षाची उमेदवारी मागितली आहे तत्पूर्वी मतदार संघात मतदारांशी गाठीभेटी घेऊन जनतेचा कौल जाणून घेत आहोत निवडणुका जिंकून नुसतं सत्ता मिळविणे इतकाच उद्देश न ठेवता आपल्या भागाचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करीत आहोत. वास्तविक पाहता बीड जिल्हाबरोबर आष्टी-पाटोदा -शिरूर हा कायम दुष्काळी भाग असून मतदारसंघातील अनेक ज्वलंत प्रश्न आहेत त्यासाठी आवश्यक त्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरेल असे औद्योगिक क्षेत्र,उच्च शैक्षणिक दर्जा निर्माण करण्याचा संकल्प केला,तसेच शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करुन मतदारसंघात जलक्रांती बरोबर हरितक्रांती करण्याचा मानस व्यक्त करतांना दिसत आहेत यावेळी मोठया प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

> “आष्टी मतदार संघाचे नेतृत्व करण्याची फक्त एक वेळ संधी ध्या,सर्वांगीण विकास काय असतो ते नक्कीच दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही
>
> **-डॉ.महेश थोरवे,आष्टी/ पाटोदा/ शिरूर मतदारसंघ**

# पाटोदा येथील शासकीय आय.टी. आय.येथे संविधान मंदीराचे लोकार्पण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिध**

जागतिक लोकशाही दिना निमित्त मुंबई येथील एलपिस्तन टेक्निकल हायस्कूल येथे प्राथमिक स्वरूपात देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते राज्यातील ४३४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दुरक्षेप प्रणालीद्वारे संविधान मंदीराचे उद्घघाटन संपन्न झाले. या कार्यक्रमानंतर पाटोदा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पाटोदा नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ.दिपाली राजेंद्र जाधव यांच्या हस्ते संविधान मंदीराचा लोकार्पण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ.दिपाली राजेंद्र जाधव होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध वात्रटिकाकार सुर्यकांत डोळसे, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, महाराष्ट्र राज्य किसान सभा उपाध्यक्ष कॉं.महादेव नागरगोजे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे पाटोदा शाखा सेक्रेटरी भगवान जावळे, मराठी पत्रकार परिषद अध्यक्ष हमीदखान पठाण, मराठी पत्रकार परिषद संलग्न डिजिटल मिडिया तालुकाध्यक्ष जावेद शेख, अनिल जावळे, कदम, दिंगाबर देशमाने, राजु मोमीन यांच्या सह अनेक महिला मान्यवर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी अध्यक्षीय भाषणात नगराध्यक्षा सौ.दिपालीताई जाधव म्हणाल्या की मी आज ज्या पदावर आहे ते महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधान मुळे आहे. तर प्रसिद्धी वात्रटिकाकार सुर्यकांत डोळसे म्हणाले की सर्वच शाळेत व महाविद्यालयात संविधान मंदीराचे उद्घघाटन झाले पाहिजे. संविधानामुळे येणारी पिढी हे देशाचे भविष्य उज्ज्वल करेल असे प्रतिपादन केले. या वेळी राष्ट्रगीत गायन, संविधान वाचन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य बेलेकर सर, पाळवदे मॅंडम, शेख सर, बेंद्रे सर, माने सर, स्वामी सर, दगडे सर, पठाण सर, बशीर भाई यांनी परिश्रम घेतले.

# माजी नगरसेवक संजय पवार यांच्या कामगिरीला धर्माबाद मध्ये सलाम

## गोर गरिबांच्या मदतीला धावून येणारा एकमेव नगरसेवक?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**



भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक प्रभाग क्रमांक - २ चे अध्यक्ष संजय पवार , एक तळागाळातील व गरीब जनतेच्या विविध समस्या सोडवण्यासाठी अविरतपणे काम करणारा एक खरा समाजसेवक म्हणून ओळखला जातोय.भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ व धर्माबाद शहर रवि अन्ना पोतगंटीवार धर्माबाद प्रभाग क्रमांक - २ चे सर्व पदाधिकारी व अध्यक्ष एक उल्लेखनीय कार्य करीत असल्याचे चित्र दिसत आहे.धर्माबाद राम नगर समता नगर बऱ्याच येथील गोष्टींची सुधारणा व सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी संजय पवार यांनी अविरतपणे कार्य केले.सामान्य जनतेचे विविध प्रश्न असतील , जनतेवर होणारा अन्याय अत्याचार असेल, सामाजिक काही अडी अडचणी असतील तर सगळ्यांच्या मदतीला धावून येणारा एक समाजसेवक म्हणून सजय पवार यांच्याकड पाहिलं जात आहे.

# पानशेवडीच्या सरपंच पदी श्रीमती उज्वलाबाई मोरे यांची बिनविरोध निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार तालुक्यातील पानशेवडी येथील पूर्वीचे सरपंच सौ. गेनुबाई चव्हाण यांनी राजीनामा दिल्यामुळे सरपंच पद रिक्त झाले होते. त्यामुळे कंधारचे तहसीलदार गोरे यांनी आदेश पारीत करत सरपंच निवडणुकीचा कार्यक्रम घोषीत केला, दि.१२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मंडळाधिकारी शेख एम. एन.व ग्रामसेवक बालाजी भायेगावे यांच्या प्रमुख उपस्थित ग्रामपंचायत कार्यालय पानशेवडी येथे विशेष बैठक घेण्यात आली, सरपंच पदासाठी श्रीमती उज्वलाबाई मोरे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध सरपंच म्हणून सर्वांनुमते निवड करण्यात आली. यावेळी गेनुबाई चव्हाण, कचरूबाई मोरे, ड शिवाजी मोरे,चंद्रकांत मोरे, उषा बसवंते, नागीनबाई भालेराव, सुमित्रा नरवडे, हे सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. श्रीमती उज्वला मोरे ह्या आमदार श्यामसुंदर शिंदे व सामाजिक कार्यकर्त्यां

सौ. आशाताई शिंदे यांचे कट्टर समर्थक कोंडीबा मोरे यांच्या त्या मातोश्री आहेत.यावेळी बोलताना नवनिर्वाचित सरपंच श्रीमती उज्वलाबाई मोरे म्हणाल्या की आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून पानशेवडी गांवचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कट्टीबंध असल्याचे सांगितले, यावेळी मोरे यांच्या निवडीचे आमदार श्यामसुंदर शिंदे, सौ.आशाताई शिंदे,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे, आंबड चे तहसीलदार विजय चव्हाण,माजी सभापती ज्ञानेश्वर पा.चोंडे,भगवान पाटील मोरे, जळबा पाटील मोरे आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या



**झाडे लावा झाडे जगवा**

## चारोळी

सगळीच उत्तरे सापडतील कशी
काही प्रश्न सोडूनी दयावेत
मिळालेल्या उत्तरातून
नवीन धडे गिरवीत रहावेत.

**रंजना सानप**
**मायणी (सातारा)**

## व्हीपीके पतसंस्थेचे नवनिर्वाचित संचालक

# अनिलकुमार दर्डा यांचा मारोतराव कवळे गुरूजी यांच्या हस्ते सत्कार संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

दि.१६ सप्टेंबर २०२४ रोज सोमवारी लोकनेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या जनसंपर्क कार्यालयात उमरी येथे व्हीपीके पतसंस्थेचे नवनिर्वाचित संचालक पदी उमरी येथील प्रतिष्ठित व्यापारी अनिलकुमार दर्डा यांची निवड करण्यात आली यावेळी त्यांचा संस्थेचे अध्यक्ष मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या सत्कार समारंभामध्ये उपस्थित संस्थेचे सचिव नागनाथ पांचाळ साहेब, उमरी मार्केट कमिटी संचालक बापुराव पाटील करकाळेकर, श्रीनिवासराव अनंतवार,गोरठा माजी सरपंच भारत सावळे, आनंदराव पाटील भायेगांवकर सह अनेक जण उपस्थित होते.



# एका संयमी व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा

लोकनेता न्यूज नेटवर्क



शेवटी म्हणता येइल कोशिश करने वाले की कभी हार नहीं होती नेहमीच मोलाचे मार्गदर्शन आणि संयम ठेवण्यासाठी व सर्व मुलांना शैक्षणिक मार्गदर्शनासाठी नेहमीच सक्रिय असलेला संतोष दा. आज भल्या मोठ्या कंपनीत साहेब झाला ही ही सर्वांनी सकारात्मकतेने घेण्याची बाब.. अकेले लढने का मज्जा कोई अलग होता हैं... मला आठवतंय मी लहान पणी एक छोटा उद्योग केला होता केळ विकण्याचा. ४०० रुपया पासून मला काहीही कष्ट न घेता सहज ९०० रुपये त्या वेळेस मिळाले होते. म्हणजे मला ५०० रुपयाचा नफा त्या वेळेस झाला म्हणजे तो खूप मोठा होता. आणि खर म्हणजे ती कल्पना संतोष दादा ची होती सहज अभ्यासिकेत आम्ही अभ्यास करत असातांना सुचलेली. आणि केवळ सल्ला देऊन मोकळं न होता, त्या साठी तुला काही पैसे लागले तर मी देईल अस म्हणुन प्रोत्साहन देखील देणारा. परंतु हल्ली आपण इकडे तिकडे हिंडत असतो पण ज्यांनी अनेक पुस्तकं वाचलीत त्याच्या कडे खूप काही ज्ञान असतं अस म्हणल्यास वावग ठरणार नाही. असो पण तो आपला पहिला च उद्योग फायदेशीर ठरला याचा आनंद माझाही पेक्षा अधिक संतोष दादा ला होता. याचे मला देखील समाधान आहे.


आमचे श्रद्धास्थान
कै. सुभाष आण्णा कुल
महाआरोग्य शिबीर
२०२४
महायज्ञ आरोग्याचा, संकल्प निरोगी दौंड तालुक्याचा
कै. सुभाषआण्णा कुल मेमोरियल चॅरीटेबल ट्रस्ट
आयोजित
महाआरोग्य शिबीर २०२४
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन । धर्मादाय संलग्न रुग्णालये । पुणे जिल्हा परिषद, आरोग्य विभाग
महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना दौंड | ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे | रुरल मेडिकल असोसिएशन
दौंड मेडिकल असोसिएशन | निमा, दौंड ।इंडियन मेडिकल असोसिएशन, दौंड
इंडियन डेंटल असोसिएशन, दौंड | दौंड तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन । भीमथडी शिक्षण संस्था, दौंड
रोटरी क्लब ऑफ दौंड | नेताजी शिक्षण संस्था-सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय, केडगांव
यांच्या संयुक्त विद्यमाने
शिबिर नाव नोंदणी
१) उपजिल्हा रुग्णालय, दौंड २) ग्रामीण रुग्णालय, यवत
३) ग्रामीण रुग्णालय, वरवंड ४) तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे
५) तालुक्यातील जवळचे खासगी डॉक्टर्स व हॉस्पिटल
गुरुवार दि. १९ सप्टेंबर २०२४ रोजी
सकाळी ९ ते सायं. ५ वाजेपर्यंत
स्थळ : श्री. क्षेत्र बोरमलनाथ मंदिर बोरीपार्धी
(चौफुला), ता. दौंड, जि. पुणे
अधिक माहितीसाठी संपर्क : 7038 66 77 99
अवयव दान, श्रेष्ठ दान !!
ॲड. राहुल सुभाष कुल
आमदार, दौंड तालुका

# सहकारातुन जिल्हात नवनवीन उद्योग उभारून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देऊ-चेअरमन मारोतराव कवळे गुरूजी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

पश्चिम महाराष्ट्र हा सहकारातुन प्रचंड पुढे गेला. स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांनी जिल्हातील शेतकरी आर्थिक बाजुने सक्षम झाला पाहिजे हे उद्दिष्ट ठेवून ईसापूरचे धरण बांधुन आपल्या जिल्हाला ३३ टक्के टीएमसी पाणी उपलब्ध करून दिले. पेट्रोल व डिझेल, गॅस हे बाहेर देशातून उपलब्ध करून देण्यासाठी भारताले मोठी किंमत मोजावी लागत आहे.जर हेच गोदावरी नदीतून पावसाळ्यातील ३०० टिएमसीच्या वर पाणी समुद्रात जाणारे विदर्भ व मराठवाडय़ात वळवले तर हा भाग सुजलाम सुफलाम होईल. भागात इतर पिकांसह ऊसाचे क्षेत्र वाढले तर सिएनजी सारखे पेट्रोल तयार करून तोच पैसा भारतातच चलनात राहिल.त्यात आपला महाराष्ट्र आर्थिक बाजुने सक्षम बनेल आणी विदर्भ व मराठवाडय़ातील शेतकरी आत्महत्या बंद होतील. त्यासाठी मतदारांनी विधानसभेला व लोकसभेला चांगले उमेदवार निवडले तर पुढे कामाचे




नियोजन लागेल असे कवळे पतसंस्थेचे चेअरमन मारोतराव कवळे गुरूजी यांनी प्रतिपादन केले

कै.व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ता.१४ सप्टेंबर रोज शनिवारी श्रीकृष्ण मंगल कार्यालय तरोडा बुद्रूक नादेड येथे संपन्न झाले.यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष मारोतराव कवळे गुरूजी,व्हाईसचेअरमन माधवराव पाटील बोडके,संचालक किशनराव रॅपनवाड, अनिल काचावार, संभाजीराव बैनवाड, प्रभाकरराव पुयेड, गणेशराव पाटील ढोलउमरीकर, महादेवराव पटने, किशोर पाटील लगळूदकर, बापूराव पाटील करकाळेकर, संभाजी पाटील माजंरमकर,पिराजी पाटील पाटोदेकर,संजय पाटील शेळगावकर,गणेशराव पाटील कवळे, उमाजी पाटील नादरे,दादाराव पाटील मुगावकर,पडींतराव बेंबरे पाटील, गणपतराव पाटील हस्सेकर, जगदेवराव पाटील कुंटूरकर, दिगांबरराव पाटील कदम करकाळेकर, परमेश्वर पाटिल कवळे,सोपानराव पाटील कदम,आनंद चव्हाण बोळसेकर, शिवा पाटील कदम भायेगावकर,दादाराव पाटील पवळे पळसगावकर, सचीव नागनाथ पांचाळ,सीईओ अण्णाराव शिंदे, जनरल मॅनेजर नामदेवराव इंगोले आधीसह सर्वच संचालक उपस्थित होते.प्रारंभी प्रस्ताविक संस्थेचे सल्लागार उदयकुमार कुलकर्णी यांनी लेखाजोखा सादर केले.खातेदार, ठेवीदार, कर्जदार व सभासद यांच्या विश्वाने कवळे पतसंस्था जिल्हात यशस्वी वाटचाल करीत आहे.भागाला हरितक्रांतीतून पुढे नेयाचे आहे.पुर्वी शेती कष्टकरी शेती होती आता आधुनिक पध्दतीने शेती केल्यास शेतकऱ्यांच्या ऊस उत्पादकात भर पडेल त्यातुन इथेनॉल निर्मिती झाले तर ऊस पिंकाला जास्तीचा भाव देता येईल शेतक-यांचे आर्थिक उत्पन्न वाढले तर हाच खरा विकास म्हणता येईल.कवळे पतसंस्था हि जिल्हात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून आत्महत्याग्रस्त कुटूंबीयांना पिठाचे गिरणी व शिलाई मशीन मदत,तळ्यातील गाळ उपसा,असे सामाजिक अनेक उपक्रम हाती राबवतोत,भागात नवीन उद्योग उभारून बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देऊ.शेतकऱ्यांच्या पिकवलेल्या मालाला उंचाक भाव देऊ.सहकार काय असते जिल्हासह मराठवाड्यात दाखवून देऊ असे शेवठी मारोतराव कवळे गुरूजी यांनी बोलतांना व्यक्त केले.डॉ.के.सी गोरे,अवधूत पाटील शिंदे लोणीकर,कोल्हेवाड सोमठाणकर,ग्यानोबा पाटील माजंरमकर, आधीने पतसंस्थे बद्दल विचार मांडले.

यावेळी सुत्रसंचलन विक्रम सोळंके तर आभार शिवाजी पुयेड यांनी मांडले

# शासकीय इतमामात सी,आर,पी,एफ जवान संभाजी आमटे यांच्यावर अंत्यसंस्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

आदर्श गाव पिंपळदरी येथील १४० बटालियन चे सी.आर.पी.एफ. जवान संभाजी आमटे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने पुसद येथील हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान शनिवार १४ सप्टेंबर रोजी १२ वाजताच्या दरम्यात दुःखद निधन झाले, सैन्यातील जवानाचा मृत्यू झाल्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली होती.संभाजी आमटे यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले.१२वी नंतरचे महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच १९९६ मध्ये सी.आर.पी.एफ,बटालियन मध्ये रुजू झाले होते,जम्मू काश्मीर, आसाम, मिझोराम,बिहार,अशा देशातील अनेक राज्यात त्यांनी २८वर्ष आपली सेवा बजावली होती. तर आता ते मणिपूर येथे आपले कर्तव्य बाजाबत होते,कामा निमित्ताने गावाकडे येत असताना प्रवासात त्यांच्या छातीमध्ये दुःखत होते म्हणून त्यांनी पुसद येथे बसमधून उतरून थेट रुग्णालय गाठले आणि रुग्णालयात भरती झाले,पण उपचारादरम्यान



त्यांना मोठा हृदयविकार झटका आल्याने त्यांनी या जगाचा निरोप घेतला रविवारी दुपारी १ वाजता त्यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी पिंपळदरी येथे आणण्यात आले.सी.आर.पी.एफबटालियनच्या जवानांकडून त्यांना मानवंदना देऊन शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले, त्यांच्या अंत्यविधीसाठी उमरखेड मतदार संघाचे माजी आमदार विजयराव खडसे,जिल्हा परिषद माजी अर्थ व बांधकाम सभापती तातूभाऊ देशमुख,विश्वपाल धूळधुळे,बाजार समितीचे उपसभापती मंचकराव चव्हाण,बाळासाहेब देशमुख यांच्यासह मोठ्या प्रमाणात राजकिय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने गावातील,परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.तर प्रशासना मार्फत पोफाळी पोलीस स्टेशनचे पी,एस,आय, आशिष झिमटे, सी,आर,पी,एफ, जवानांची तुकडी उपस्थित होती.या सर्वांच्या उपस्थितीत साश्रुनयनांनी त्यांना शेवटचा निरोप दिला

# गोरगरीब जनतेसाठी सदैव रस्त्यावरची संघर्ष करणारा पत्रकार–आशिष मूंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

सोनपेठ शहरातील गोरगरीब जनतेसाठी सदैव रस्त्यावरची संघर्ष करणारा पत्रकार म्हणजे आशिष दयानंद मूंडे

आशीष मुंडे यांचा आज वाढदिवस हे अंत्यंत गरीब कुटुंबात जन्म झाला अगदी तरुण वयात सामाजिक कार्यात सहभाग घेतला फुले शाहु आंबेडकर यांच्या विचारांवर विश्वास ठेवणारा कार्यक्रता म्हणून सोनपेठ शहरात ते थोड्या दिवसातच नावारूपाला आले शहरातील झोपडपट्टी असेल किंवा त्यांचे समस्यावर प्रशासनाला धारे वर धरून समस्या सोडवण्याची धमक असणारा कार्यक्रता म्हणून सोनपेठ शहरात ओळखले जाते कार्यक्रता म्हणून काम करत असताना त्यांना प्रशासनाचे कारनामे उघड करण्यासाठी प्रसार माध्यमांची गरज भागवू लागली त्यामुळे त्यांनी १७ सप्टेबर २०२१ रोजी जनता न्यूज २४ तास या युट्यूब चॅनलची निर्मिती केली आज रोजी या या चॅनलला तीन वर्षे पूर्ण झाली या तीन वर्षांत चॅनलनी



मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात आपली छाप निर्माण केला आहे याचं सर्व श्रेय हे चॅनलचे संपादक म्हणून आशिष मूंडे यांना जाते अंत्यंत शांत मितभाषी प्रेमळ स्वभाव असणारे व्यक्तिमत्त्व आहे चॅनलचे संपादक म्हणून काम करताना कुठली अपेक्षा न ठेवता सहकार्यांना सांभाळून घेत ही मोठठी जम्मेची बाजु सर्वांना भावणारी आहे गेल्या तीन वर्षांपासून मी चॅनलचा बिलोली तालुका प्रतिनिधी म्हणून काम करताना आलेला माझ अनूभव आहे आपल्याला पत्रकारीता करताना निस्वार्थी निर्भिड पणे केले पाहिजे सर्व सामान्य जनतेसाठी सदैव धावून त्यांच्या समस्या चॅनलच्या माध्यमातून शासनापर्यंत पोहचवा असे मार्गदर्शन करतात. आज त्यांचा वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच मनोकामना...

# शरद पवारांच्या भेटी नंतर ॲड.नरसिंह जाधव यांना आष्टी मतदार संघात जनसामान्यांची पसंती वाढली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

आष्टी/ पाटोदा/शिरूर विधानसभा मतदारसंघात निवडणुकीचा जोर चांगलाच वाढू लागला असून, इच्छुक उमेदवार आपापल्या पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळवण्यासाठी आटापिटा करू लागले आहेत. उमेदवारी आपल्यालाच मिळणार असा दावा जनसंपर्क दौऱ्यातून केला जात आहे. या मध्ये शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे इच्छुक उमेदवार ड.नरसिंह जाधव यांनी गेल्याच आठवड्यात शरद पवार यांची भेट घेऊन मतदार संघात केलेल्या संपर्क दौऱ्याचा अहवाल सादर केला. या नंतर पवार यांनी ही जाधव यांना वेगाने संपर्क दौरा वाढविण्याची सूचना करून उमेदवारीबाबत ग्रीन सिग्नल दिल्याने आता आष्टी विधानसभा मतदार संघातून ड.नरसिंह जाधव यांना जनसामान्यातून मोठी पसंती मिळू लागली आहे. मतदारसंघातील अनेक गावातून त्यांना भेटीसाठी येण्याचे निमंत्रण दिले जात आहे. गावागावातून गणेश मंडळाचे आरतीचे निमंत्रणे, संपर्क



दौऱ्यात गावागावातून मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत करण्यात येत असून आम्ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासनही नागरिक आता जाधव यांना देऊ लागले आहेत. पाटोदा तालुक्याचा दौरा जवळ जवळ पूर्ण करत आता शिरूर तालुक्यात त्यांनी दौऱ्याला सुरवात केलेली दिसत आहे. जाटनांदुर, सिंदफाना, राक्षसभुवन, गोमळवाडा, शिरूर शहर सह आदी गावांना ॲड.नरसिंह जाधव यांनी रविवारी भेटी दिल्या, डोंगरकिन्ही येथे सरपंच अण्णासाहेब येवले, तालुका कार्यध्यक्ष बाबुराव म्हस्के, ग्रा.प.सदस्य नवनाथ मळेकर, केशव चव्हाण, राजेंद्र मस्के आदींची भेट घेतली. तर जाटनांदूर येथे गंगाराम जेधे सर, सुंदरबापू जेधे, महादेव जेधे, बाळासाहेब जेधे सर, नामदेव चव्हाण, अशोक चौधरी, गौतम घायाळ, चेअरमन एस.पी.चौधरी, सरपंच सचिन माने सह आदी गावकरी उपस्थित होते. नाळवंडी येथे माजी सरपंच विठ्ठल गुजर, माजी सरपंच भगवान काकडे, पोलीस पाटील विठ्ठल पठाडे, भरत गुजर, ग्रा.पं.सदस्य गणेश मळेकर, तालुका सरचिटणीस मौलाभाई शेख, शहामहमंद शेख, बबन पाटील व आदी ज्येष्ठ मंडळींनी ॲड.नरसिंह जाधव यांचे स्वागत केले. पाटोदा तालुक्यातून पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाकडून ड.नरसिंह जाधव हे निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असून त्यांनी पक्षाकडे आपल्याला उमेदवारीची संधी मिळावी अशी मागणी केली आहे. त्या साठी त्यांनी मतदारसंघातील गावागावात भेटी देऊन सर्व सामान्य लोकांशी चर्चा केली. या वेळी जनतेतून त्यांना उस्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मतदार संघातील प्रस्थापित नेत्याबद्दलचा रोष नागरिक बोलून दाखवित आहेत. संपर्क दौऱ्यात तालुक्यातील विविध सामाजिक, राजकीय विषयांवर चर्चा करण्यात येऊन, सर्व सामान्यांच्या समस्या ऐकून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावले जात आहेत. काही प्रकरणात न्यायालयीन लढा लढण्यासाठी कायदेशीर मदत ही लोकांना होत असल्याने जनतेतून त्यांना उस्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

# मा.आ.भिमराव धोंडे यांच्या हस्ते आरती करुन बाबाजी गणेश मंडळांच्या गणरायाला वाजतगाजत निरोप



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

येथील बाबाजी प्रतिष्ठान गणेश मंडळांच्या गणरायाचे रविवारी सायंकाळी वाजत गाजत विसर्जन करण्यात आले.

रविवारी सकाळी श्री.गणरायाची आरती आष्टी विधानसभा मतदारसंघाचे नेते मा.आ.भीमराव धोंडे यांच्या हस्ते करण्यात आली.यावेळी दादासाहेब जगताप व सौ. अर्चना दादासाहेब जगताप यांच्या हस्ते विधीवत पुजा करण्यात आली.याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष अभयराजे धोंडे,चेअरमन राजेंद्र धोंडे, नगरसेवक आस्लम बेग,मधुकर जायभाये,अशोक गर्जे, कॉन्ट्रॅक्टर भागवत गर्जे,बाबुराव कदम,विधाते आण्णा,सचिन सायकड,डॉ.डी.बी राऊत,प्रा. शिवदास विधाते,प्राचार्य डॉ वाघ,अभिलाष गाडेकर,नितीन निकाळजे,ग्रामपंचायत सदस्य प्रविण धोंडे,आदेश निमोनकर व इतर भक्तगण उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी सायंकाळी बाबाजी प्रतिष्ठान गणेश मंडळांच्या गणरायाचे हजारों गणेश भक्तांच्या उपस्थितीत वाजतगाजत मिरवणूकीने जाऊन विसर्जन करण्यात आले.यावेळी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशा घोषणा देत गणरायाला निरोप दिला.

# ग्रामसेवक यांना शेतीच्या बाबी समजत नाही, म्हणून तहसीलदारांनी योग्य निर्णय घ्यावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यात अतिवृष्टीचे पंचनामे करण्यासाठी बऱ्यांच गावात ग्रामसेवक यांची ऑर्डर तहसीलदार यांनी काढली आहे
म्हणून आपणास विनंती आहे की ग्रामसेवक यांना शेती मधील पंचनाम्याच्या बाबी
समजतात व त्यांना शेतीचा
पुरेपुर अभ्यास आहे म्हणून
त्यांची ऑर्डर काढली का? आपल्या स्तरावरून योग्य तो निर्णय घ्यावा अशी अर्जाद्वारे मागणी साईनाथ मोरे यांनी केली आहे. बऱ्यांच गावोगावी पिक विमा प्रतिनिधीची जी निवड केली त्यांना शेतीमधील ०%
ज्ञान व माहिती आहे अश्या मुलांची पंचनाम्यासाठी निवड केली जाते हे देखील योग्य नाही नायगाव कृषी कार्यालयामध्ये तालुक्यातील ज्या ज्या शेतकऱ्यांनी ऑफलाईन तक्रारी केल्या त्यांचे पंनानामे कधी करणार ते फॉंम अजूनही कार्यालयचं धुळ खात पडले आहेत.गावोगाव पिक विमा प्रतिनिधी शेतकऱ्यांकडून पैसे घेत आहेत त्यावर तुम्ही बोलत नाही हे कारण काय असावे. या अर्थी प्रशासन त्यांना पाठीशी घालत आहे का ? कुठे तरी तुमची पण मिलीभगत आहे असे उघडपणे दिसून येते विमा प्रतिनिधी शेतात जाऊन शेताची फोटो घेत आहेत पण पिकांच्या नुकसानीची % टाकत नाहीत.शेतकऱ्यांच्या कोऱ्या फॉंमवर सह्या घेऊन मोकळं करत आहेत कुठं तरी शेतकऱ्यांचे डोळे पुसण्याचे कामे बंद करा तुम्ही तालुक्याचे माय-बाप जनतेचे तालुक्यातील शासन कर्ते आहात ह्या गोष्टीचे जाण असावी मेटाकुटीला आलेल्या शेतकऱ्यांचे हित कसे करता येईल ते आपल्या स्तरावरून योग्य प्रतिनिधी निवडून त्वरित मार्ग निवडावा असे वाटते.

# किनाळा येथील असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

नांदेड येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या कार्यालयात नायगाव, बिलोली,धर्माबाद,तालुक्यातील विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केला त्यात किनाळा येथील असंख्य कार्यकर्तेही पक्ष प्रवेश केले आहे.बिलोली तालुक्यातील किनाळा येथील अनेक कार्यकर्त्यांनी आज दिनांक १६ रोजी नांदेड येथे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर,प्रा



डी बी जांभरुणकर ,सुभाष गायकवाड,गजानन पापटवार,डॉ वरपडे,प्रा मजरोदिन ,विश्वनाथ बडुरे,अंकुश पाटील रातोळीकर, बाळू गायकवाड,दिलीप कदम,पुंडलिक नवारे आदींचा प्रमुख उपस्थितीमध्ये सोसायटीचे सदस्य बालाजी वामनराव पाटील, शिवकुमार मोहिते,रविकुमार उपलवार, सय्यद कासिम मीरासाब, सय्यद मैनोदीन हुसेनसाब,गुणवंत पांचाळ, बालाजी शेळगावे, सय्यद शादुल महबूब, विकास पाटील भोसले, हनमंत उस्केटवाड, ओमकार भोसले, ओमकार रिजितवाड, देवानंद पाटील शेळगावे,माधव वडमिले, सय्यद खाजामिया महंमदसाब, गोपाळ वडमिले, ज्ञानेश्वर गायकवाड, विनायक उप्पलवार, बालाजी खराटे,देविदास गवळे, माधव धानोरे,आदींनी पक्ष प्रवेश केला आहे.या पक्ष प्रवेशाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

# एस बी पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

## चालु वर्षी नवीन डमिशनचा ७०० चा टप्पा पार;८०० पेक्षा जास्त मुलांना वस्तीगृहामध्ये राहण्याची सुविधा

**डी फार्म, बी फार्म अभ्यासक्रमाची सुविधा!**

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून या संस्थेने औषध निर्माण शास्त्रामधील डिप्लोमा व डिग्री अर्थात डी फार्म,बी फार्म याचे देखील आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रयोगशाळा,उत्तम शिक्षण देण्याची सुविधा निर्माण करून दिलेली आहे.याचा देखील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्वत:च्या गुणवत्तेसाठी उपयोग करून घ्यावा,असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.**







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठान संचलित वनगळी (ता इंदापूर) येथील एस बी पाटील महाविद्यालयामध्ये अभियांत्रिकी,डिप्लोमा व एमसीए अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ साठी विद्यार्थी डमिशनचा ७०० चा टप्पा पार करून,शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठान शैक्षणिक संकुलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

चालू शैक्षणिक वर्षांमध्ये सर्वोत्तम गुणवत्तापूर्ण शिक्षण,प्रात्यक्षिकांवरती आधारित ज्ञान व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये ट्रेनिंग अँड प्लेसमेंटच्या माध्यमातून उच्चतम पगाराची नोकरी उपलब्ध करून देणे हे संस्थेचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा. हर्षवर्धन पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे ग्रामीण भागातील मुलांना उच्च तंत्रशिक्षण क्षेत्रात सर्वोत्तम शिक्षण सोयी सुविधा निर्माण करू दिल्यामुळे ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना या संस्थेने जागतिक व्यासपीठ करून दिले आहे. एस बी पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सन २००९ पासून सुरू झाले.सध्या या महाविद्यालयामध्ये पदविका,पदवी व पदव्युत्तर शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिलेले आहेत. या महाविद्यालयामध्ये कम्प्युटर,इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन,सिविल,मेकॅनिकल,इलेक्ट्रिकल, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स, माहिती तंत्रज्ञान आदी अभ्यासक्रम शिकवले जात आहेत. या महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदे (नॅक ) कडून अ श्रेणी प्राप्त झाली आहे.या महाविद्यालयामध्ये अभियांत्रिकी, डिप्लोमा,एमसीएचे हजारो विद्यार्थी सध्या देश व परदेशात नामांकित कंपन्यांमध्ये उच्चपदावर काम करीत आहेत.सदरच्या कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील,सचिव भाग्यश्री पाटील,उपाध्यक्षा अंकिता पाटील-ठाकरे, विश्वस्त राजवर्धन पाटील यांनी प्राचार्य,कडमिक डीन,सर्व विभाग प्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

### अहले सुन्नत खिदमत कमिटी तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

# मोहम्मद पैगंबर जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे सुद्धा आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम राजा




मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतनिमित्त शहरातील तातार शाह बाबा दर्गाह परीसरात अहले सुन्नत खिदमत कमिटी या सामाजिक संघटने तर्फे मुस्लिम समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. इस्लाम धर्माचे शेवटचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांची जयंती उमरखेड शहरात सोमवारी विविध सामाजिक उपक्रमाने पार पडली. शहरातली अहले सुन्नत खिदमत कमिटी ही सामाजिक संस्था मागील अनेक वर्षांपासून मुस्लिम समाजातील शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात सक्रीय असून ही संस्था अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवत असते. मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निम्मित देखील शहरातली तातारशाह बाबा दर्गाह परीसरात मुस्लिम समाजातील गुणवंत विद्यार्थी ज्यांनी नुकतेच स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विविध विभागात शासकिय नौकरी मिळाली आहे अश्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस स्टेशन उमरखेड चे ठाणेदार संजय सोळंके यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरीक नंदू अग्रवाल हे होतें. प्रमुख पाहुणे म्हणून नगर पालिकेचे मुख्याधिकारी महेश कुमार जामनोर, गोपाल अग्रवाल, डॉ सुनिल बंग, डॉ.मुशफिक, डॉ मुजम्मील लाला, साजिद जागीरदार, जलील कुरैशी, स्वप्निल कनवाळे, रसुल पटेल, एजाज खान, जीयाउद्दिन खतिब, शेख तालिब वजाहत मुजावर, शाहरूख पठाण, अहमद पटेल, अकमल नुरानी, आदि उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिक कुरेशी यांनी केले तर आभार सज्जाद खान यांनी व्यक्त केले. जिजाई ब्लड बँक नांदेड च्यां वतीने सर्व रक्तदात्याना प्रमाणपत्र देऊन आभार व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अहले सूनत खिदमत कमिटी चे अध्यक्ष निहाल रजा , उपाध्यक्ष शहाबाज खान,सचिव सज्जाद खान सह सचिव दानिश खतीब,कार्याध्यक्ष - सलीम शेख व सदस्य वकार भाई,जब्बार भाई, अबरार भाई, अफोज भाई ,अश्फाक अली. आलिम शेख़. नदीम खान, शेख जुनेद , शेख़ नदीम, मुश्फिक अली आदींनी परिश्रम घेतले.

## मा अरविंद केजरीवाल यांची जमानत मंजूर बीडमध्ये आम आदमी पार्टीचा जल्लोष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा माननीय अरविंद केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री यांचे आज सुप्रीम कोर्टाने जमानत मंजूर केली या देशातील भारतीय जनता पार्टीच्या सरकारने विरोधकांना सीबी आणि ईडीच्या माध्यमाने सामान्य जनतेचा आवाज दाबण्याचे काम करण्यात आले आणि याच सीबीआय वरती सुप्रीम कोर्टाने आज प्रश्नचिन्ह निर्माण केल्या या भारतीय जनता पार्टीने सीबीआय ईडी चा वापर करून आम आदमी पार्टीच्या नेत्यांना पाठीमागील काही दिवसापासून नाही तर वर्षापासून जेलमध्ये टाकण्याचे काम केले आणि आज या भारतीय जनता पार्टीला एक चपराक देण्याचं काम सुप्रीम कोर्टाने केले आहे आणि अरविंद केजरीवाल यांना जामीन देऊन सत्यमेव जयते सत्य परेशान हो सकता है पराजित नही या म्हणीप्रमाणे सत्य करून दाखवले आहे याच खुशीमुळे बीड येथे बसेर्गन चौकात आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने तोफा व पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला यावेळी माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष सय्यद सादिक शहराध्यक्ष अजून खान तालुका उपाध्यक्ष रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख युवा नेते प्रवीण आनेराव अक्रम शेख इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चैतन्य विद्यालयाची गणेश विसर्जन मिरवणूक दिमाखात संपन्न

## विविध पथकांनी जिंकली प्रेक्षकांची मने

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

ओतूर । मयूर ढोबळे





येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयाची श्री गणेश विसर्जन मिरवणूक अतिशय दिमाखात आणि भव्य दिव्य जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.
चैतन्य विद्यालय ही उत्तर पुणे जिल्ह्यातील एक प्रथितयश आणि नामांकित शाळा असल्यामुळे दरवर्षी श्री गणेशाच्या विसर्जनाच्या मिरवणुकीचे परिसरातील लोकांना आकर्षण असते. दरवर्षी ही मिरवणूक अतिशय भव्य दिव्य आणि चैतन्य विद्यालयाच्या परंपरेला साजेशी असते. याही वर्षी ही मिरवणूक सकाळी साडेनऊला सुरू झाली आणि दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी संपली. या मिरवणुकीमध्ये सोलापुरी लेझीम, झेंडा पथक, ढोल पथक, झांज पथक, वेशभूषा पथक ,आदिवासी पथक, टाळ पथक, दांडिया पथक, लेझीम पथक, बम बम बोले पथक, तीन पावली पथक, पॉम् पॉम पथक,स्वयंसेवक पथक आदि पथकांचा यामध्ये समावेश होता. संपूर्ण बाजारपेठ आणि परिसरातील लोकांनी ही मिरवणूक पाहण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. या पथकांसाठी विद्यालयाचे क्रीडा प्रमुख शरद माळवे, राजाराम शिंदे, संतोष कांबळे, देवचंद नेहे, विजया गडगे, विशाल चौधरी, मिलिंद खेत्री, अमित झरेकर, बाळासाहेब साबळे, वनिता भोर,सोनाली माळवे, सोनाली कांबळे, संतोष सोनवणे, लक्ष्मण दुडे,आसावरी गायकर, आशा गाडेकर,प्रमोद जाधव, अजित डांगे, अनिल जवरे, दिनेश ताठे, ज्ञानेश्वर वळे,आशा डुंबरे, अनुराधा इसकांडे, सुजाता राऊत, अश्विनी नलावडे, तनुजा थोरात, साक्षी देशमुख, सौरभ ढमाले, हर्षल शितोळे, निर्मला डोंगरे या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. या श्रींच्या विसर्जन मिरवणुकीमध्ये संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, राजेंद्र डुंबरे, रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे, आत्माराम गाढवे,संजय वल्हवणकर, शांताराम पानसरे, अमोल डुंबरे, प्रकाश डुंबरे, प्रशांत डुंबरे, सत्यभामा डुंबरे, सुशीला गावडे, सुरेश गावडे, महादेव ओतुरकर, भिवाजी माळवे गुरुजी, रामदास डुंबरे, विलास सुतार, छबुराव थोरात, स्मिता डुंबरे, ज्ञानेश्वर पानसरे, सुनील वैद्य, डी.डी .पानसरे आदी मान्यवर ग्रामस्थ सहभागी झाले होते. प्रदीप गाढवे, पंकज घोलप,संजय हिरे, अनिल उकिरडे,भाऊसाहेब खाडे, मंगेश तांबे यांनी मिरवणुकीचे संयोजन केले. त्याचप्रमाणे विजय खरात, प्रसन्न तांबे, मयूर जाधव, योगेश फापाळे, ईश्वर ढमाले, अरविंद आंब्रे , तेजस ढमाले, दीपक हांडे यांचेही सहकार्य मिळाले. विसर्जन मिरवणुकीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904